मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्ध पत्रक

## ❖ मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी मिरा भाईदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे आणि उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग समिती क्रमांक ०५ आणि वॉकहार्ट हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सफाई कर्मचाऱ्यांसाठी विशेष मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्यसुरक्षेला प्राधान्य देत त्यांचे शारीरिक स्वास्थ्य आणि कार्यक्षमता वाढविणे हा होता.या शिबिरात एकूण २१० सफाई कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. सहभागी कर्मचाऱ्यांनी रक्तदाब, रक्तातील साखर (शुगर), ईसीजी, नेत्र तपासणी, हाड तपासणी (BMD), फुफ्फुस तपासणी (PFT) तसेच डॉक्टरांकडून आरोग्याविषयक विविध वैद्यकीय सल्ले आणि विविध वैद्यकीय तपासण्यांचा लाभ घेतला. सर्व तपासण्या तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत पार पडल्या, तसेच प्रत्येक कर्मचाऱ्यास त्यांच्या आरोग्यस्थितीबाबत वैयक्तिक मार्गदर्शन देण्यात आले.

शिबिरादरम्यान कर्मचाऱ्यांना संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि स्वच्छतेचे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली. मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागाच्या सहकार्याने पार पडलेल्या या उपक्रमाला सफाई कर्मचाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी वॉकहार्ट हॉस्पिटलच्या वैद्यकीय टीमचे तसेच महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे विशेष योगदान लाभले. महानगरपालिका प्रशासनाकडून अशा आरोग्यविषयक उपक्रमांद्वारे सफाई कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या सामाजिक सुरक्षा बळकटीसाठी सातत्याने प्रयत्न केले जातील असे महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या वतीने सांगण्यात येत आहे.

12/11/25